Pune Police

# प्रेस नोट १०/०५/२०१९

**सोन्याच्या दुकानावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असणाऱ्या सराईत चोरटयांना येरवडा पोलीसांकडुन अटक एकुण ५,१५,०००/- रुपायांचा मुददेमाल जप्त-**

दिनांक ०९/०५/२०१९ रोजी ०६.०० वाजताचे सुमारास बंडगार्डन पोलीस स्टेशन हददीमध्ये निर्जन स्थळी फिर्यादी यांना अडुवन दरोडा टाकुन त्यांची सोन्याची चेन व रोख रक्कम हि लुबाडले असताना सदर घडलेल्या दरोडयाच्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेण्यासाठी व येरवडा पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये अशा प्रकारच्या गुन्हे प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने येरवडा तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोना/अशोक गवळी व पोना/शरदबांगर,पोशि/राहुल परदेशी, पोशि/सुनिल नागलोत हे पेट्रोलिंग करीत असताना पोना/अशोक गवळी व पोशि/शरद बांगर यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, येरवडा पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये काही तडीपार इसम हे त्यांचे काही साथीदारांसह बंगला नं.५ येरवडा पुणे येथे उभे असुन ते येरवडा भागात सोन्याच्या दुकानावर दरोडा टाकणार आहेत. अशी बातमी मिळाल्याने लागलीच तपास पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी सदर ठिकाणी जावुन छापा टाकुन सदर इसमांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ते विचारता त्यांनी त्यांची नावे **१) सुरज ज्ञानेश्वर जाधव वय २२ वर्षे रा. स.नं.१०३ जयप्रकाश नगर येरवडा पुणे २) मनोज बबन गायकवाड वय ३५ वर्षे रा.सदर ३) आकाश भगवान मिरे वय २१ वर्षे रा. सेवक चौक कामराजनगर येरवडा पुणे ४) विजय काशीनाथ कांबळे वय ३१ वर्षे स.नं.१०३ जयप्रकाश नगर येरवडा पुणे ५) सागर दिपक अडागळे वय २० वर्षे रा.सदर ६) रुपेश दिलीप अडागळे वय २१ वर्षे रा.सदर ७) अभिजीत आनिल मिसाळ वय २० वर्षे रा. सदर अशी सांगितली आहेत.** त्यांचेकडे सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारुन चौकशी करता त्यांनी सांगितले की, ते येरवडा भागात सोन्याचे दुकान लुटण्याच्या तयारीत होते. म्हणुन त्यांची झडती घेता त्यांचे ताब्यात घातक हत्यारे व दरोडयाचे साहीत्य मिळुन आले तसेच त्यांना अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी दिनांक ०९/०५/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वाजणेचे सुमारास बडगार्डन पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये अलंकार चौक येथे पायी चालत जाणाऱ्या इसमास मारहाण करुन त्याचेकडुन सोन्याची चेन,रोख रक्कम, सॅक इत्यादी माल चोरल्याचे कबुल केले आहे. सदर आरोपी हे येरवडा पोलीस स्टेशन,खडकी पोलीस स्टेशनच्या रेकॉर्ड वरील आरोपी असुन त्यांचेवर यापुर्वी वाहन चोरी,जबरी चोरी,मारामारी अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेवर येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३४२/२०१९ भा.द.वि.क.३९९,४०२ दाखल करुन सदर गुन्हयात त्यांना अटक करुन त्यांचे कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.

१) येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३४२/२०१९ भा.द.वि.क.३९९,४०२

२) येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. २२५/२०१८ भा.द.वि.क.३७९ (वाहनचोरी)


येरवडा पोलीस स्टेशन पुणे